1

वाचले :- १) जनहित याचिका क्र.१५५/२०११ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.३१/०१/२०१७ रोजी दिलेले आदेश.

२) उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र./संकीर्ण/२०१६/ प्र.क्र.७२/ म-६, दिनांक २१/३/२०१७ रोजीचे पत्र.

---

क्र.महसूल/क-१/टे-१४/न्या.प्र./कावि-७८/२०१७
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे
दिनांक ९/०५/२०१७

आदेश :-

ज्या अर्थी, उपोदघातातील पत्रान्वये मा. उप सचिव, महसूल व वन विभाग यांनी दिलेल्या सुचनांनुसार उक्त नमूद केलेल्या जनहित याचिकेमध्ये The Maharashtra Preventaion of Defacemnet of Property Act १९९५ च्या ॲक्ट मधील तरतुदी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयावरती सोपविली आहे त्यानुसार महानगरपालिका/ नगरपालिका / नगरपंचायत क्षेत्र वगळता नायब तहसिलदारापेक्षा कमी दर्जा नसलेल्या महसूल अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करणेत यावी असे आदेश दिलेले आहेत.

त्याअर्थी, मी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी ठाणे The Maharashtra Preventaion of Defacemnet of Property Act १९९५ चे कलम ५ मध्ये नमूद केल्यानुसार अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग्ज, पोस्टर्स इ. संदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अन्वये कार्यवाही करणेकामी खालील तक्यात नमूद तहसिलदार यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे.

सदर नोडल अधिकारी यांनी अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग्ज, पोस्टरर्स इ. संदर्भात करावयाच्या तक्रारी बाबत नागरीकांना टोल फ्री नंबर, व्हॉटसप नंबर, ई-मेल आयडी द्वारे तक्रार निवारण यंत्रणा तात्काळ उभारण्यात यावी. सदर तक्रार निवारण यंत्रणेस महत्वाच्या वर्तमान पत्रामध्ये तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे प्रत्येक सार्वजनिक सण, समारंभापूर्वी व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. सदरचे काम प्रथम प्राधान्याने पार पाडणेबाबतची कार्यवाही करावी.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. किसन भदाणे | तहसिलदार ठाणे |
| २ | श्री. किरण सुरवसे | तहसिलदार कल्याण |
| ३ | श्री. सर्जेराव म्हस्के-पाटील | तहसिलदार मुरबाड |
| ४ | श्री. उत्तम कुंभार | तहसिलसदार उल्हासनगर |